MHND250002152022

| | | |
|---|---|---|
| दाखल केल्याचा दिनांक | – | २०.०४.२०२२ |
| नोंदणी केल्याचा दिनांक | – | २०.०४.२०२२ |
| पारीत केल्याचा दिनांक | – | १८.०३.२०२६ |
| कालावधी | – | वर्ष महिना दिवस<br>०३ १० २६ |

**उमरी येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, उमरी यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी के.एस.कुलकर्णी)**
**नियमीत फौजदारी खटला क्र.३६/२०२२**

**नि.क्र.७९.**

**भाग–अ**

| | |
|---|---|
| **प्रथम खबर तपशिल** | उमरी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. २६०/२०२१ चा भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, सहकलम १४९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. |
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत - पोलीस ठाणे अंमलदार,<br>उमरी पोलीस ठाणे, |
| **सरकारी अधिवक्ता** | श्री एन.एम. मगदुम,<br>सहा. सरकारी अभियोक्ता |
| १. | **दत्तराम शंकर हंबर्डे,**<br>वय– ६२ वर्षे, व्यवसाय–शेती. |
| २. | **अनसाजी शंकर हंबर्डे,**<br>वय– ५५ वर्षे, व्यवसाय–शेती. |
| ३. | **सुधाकर शंकर हंबर्डे,**<br>वय– ५० वर्षे, व्यवसाय–शेती. |
| ४. | **मधुकर शंकर हंबर्डे,**<br>वय– ४२ वर्षे, व्यवसाय–शेती. |
| ५. | **मारोती अनसाजी हंबर्डे,**<br>वय– ३० वर्षे, व्यवसाय–शेती. |

| | |
|---|---|
| ६. | **किशन शंकर हंबर्डे,**<br>वय– ३८ वर्षे, व्यवसाय–शेती. |
| ७. | **राजेश दत्तराम हंबर्डे,**<br>वय– २६ वर्षे, व्यवसाय–शेती.<br>सर्व रा.बिजेगांव ता.उमरी जि.नांदेड. |
| **आरोपींतर्फे अधिवक्ता** | श्री. अब्दुल कलाम. |

## भाग–ब

| | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याची तारीख** | ०५.१२.२०२१ |
| **प्रथम खबरीचा दिनांक** | ०५.१२.२०२१ |
| **दोषारोपपत्राचा दिनांक** | २०.०४.२०२२ |
| **दोषारोप ठेवल्याचा दिनांक** | २७.०५.२०२४ |
| **पुरावा सुरु झाल्याचा दिनांक** | १७.१२.२०२४ |
| **न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक** | ––– |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | १८.०३.२०२६ |
| **आदेशाचा दिनांक** | १८.०३.२०२६ |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनवर मुक्त केल्याची तारीख | आरोप | दोषी अगर निर्दोष | शिक्षा | फौ.प्र.स. चे कलम ४२८ अन्वये करीताचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दत्तराम शंकर हंबर्डे | ०८.१२.२०२१ | फौ.प्र.स.४१ (१) (अ) नोटीस प्रमाणे | भा.द.वी कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ , १४३, १४७, सहकलम १४९ | निर्दोष मुक्त | नाही | - |
| २ | अनसाजी शंकर हंबर्डे | -- | -- | -- | -- | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सुधाकर शंकर हंबर्डे | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ४ | मधुकर शंकर हंबर्डे | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ५ | मारोती अनसाजी हंबर्डे | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ६ | किशन शंकर हंबर्डे | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ७ | राजेश दत्तराम हंबर्डे | -- | -- | -- | -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

## ( पारीत दिनांक १८ मार्च, २०२६ )

आरोपींविरुध्द **भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, सहकलम १४९** प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

**२.** दिनांक ०५.१२.२०२१ रोजी सायंकाळी ०५ ते ०६ वाजेच्या सुमारास मौजे बिजेगाव ता. उमरी जि. नांदेड येथे आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादीस 'तुम्ही शेत गट क्र.४९ व ५० च्या बांधावरुन जावु नका' असे म्हणाले असता फिर्यादी आरोपींना म्हणाला की शासनाने त्यांना तेथुनच जाण्यासाठी पावुल वाट दिली आहे. तेव्हा सर्व आरोपींनी त्यांना शिवीगाळ केली. फिर्यादीने त्यांना समजावुन सांगण्याचा प्रयत्न केला असता जुन्या भांडणाचा राग मनात धरुन त्यांना आरोपी क्र.२ ने त्यांच्या हातातील काठीने मारहान केली. त्यामुळे त्यांच्या पाठीवर व मानेवर मुक्का मार लागुन खरचटले. त्यांना सोडवण्यासाठी श्रीकांत बाबुराव पुंडगे आले असता त्यांना आरोपी क्र.१ ने काठीने डावया हातावर मारुन दुखापत केली. तसेच, शिवाजी पुंडगे यांना आरोपी क्र.२ ने त्यांच्या

हातातील काठीने डाव्या कानाच्या पाठीमागे मारुन जखमी केले. तसेच, मुरली पुंडगे यांना आरोपी क्र.३ यांनी त्यांच्या हातातील काठीने मानेवर व पाठीवर मारुन जखमी केले. तसेच, आरोपी क्र.४ यांनी लाथाबुक्यानी फिर्यादीला व सुदर्शनला मारहाण केली. तसेच, श्रीधर पुंडगे यांना आरोपी क्र.६ यांनी हातावर व पाठीवर त्यांच्या हातातील काठीने मुक्का मार दिला. तसेच, सर्व आरोपींनी त्यांना शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी सदरचे भांडण गोविंद हंबर्डे, दत्ताहरी कदम, मारोती पुंडलिक व राजेंद्र पुंडलिक यांनी सोडवले. त्यामुळे फिर्यादीने उमरी पोलीस स्टेशनला घटनेची फिर्याद दिली.

३. त्याप्रमाणे, उमरी पोलीस ठाणे येथे **गुन्हा नोंद क्र. २६०/२०२१** चा भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, सहकलम १४९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो.हे.कॉ. आर.एफ. गेडाम, उमरी पोलीस स्टेशन यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळाचा पंचनामा करुन मुद्देमाल जप्त केला. तपासाअंती त्यांनी आरोपींविरुध्द भा.द.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, सहकलम १४९ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पुर्वीचे न्यायाधीश यांनी आरोपींविरुध्द भा.दं.वि. **कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, सहकलम १४९** साठी **(नि.क्र.४५)** अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपींस दोषारोप त्याच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले.

५. फिर्यादी व साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यात आरोपींविरुध्द दोषदर्शित पुरावा मिळून आल्याने, आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन **(नि.क्र.७१ ते ७७)** कडे नोंदवण्यात आले आहेत. आरोपींनी त्यांच्याविरुद्ध खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे.

६. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद, उपलब्ध पुरावा यांचे अवलोकन केल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारासाठी उपस्थित होतात. त्या मुद्दयांवरील निष्कर्ष कारणांसहीत मी खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०५.१२.२०२१ रोजी सायंकाळी ५ ते ६ वाजणेच्या सुमारास बिजेगाव ता. उमरी जि. नांदेड येथे आरोपींनी अपराध करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवुन, आरोपी क्र. २ यांनी फिर्यादीस काठीने पाठीवर व मानेवर मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३२४ सहकलम १४९ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय? | नाही. |
| २. | उपरोक्त नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी अपराध करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवुन, फिर्यादी व साक्षीदारांना लाथाबुक्याने मारहाण करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३२३ सहकलम १४९** अन्वये गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय ? | नाही. |
| ३. | उपरोक्त नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी अपराध करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवुन, फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ५०४ सहकलम १४९ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिध्द् केले काय ? | नाही. |
| ४. | उपरोक्त नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी अपराध करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवुन, फिर्यादी व साक्षीदारा यांना फौजदारीपात्र धाकदपटशा करुन जिवे मारण्याची धमकी देवून त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ५०६ सहकलम १४९ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय ? | नाही. |
| ५. | उपरोक्त नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी अपराध करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवुन, | |

| | | |
|---|---|---|
| | बेकायदेशीर जमावाचा सभासद होवुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम १४३ सह १४९ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय ? | **नाही.** |
| ६. | उपरोक्त नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी अपराध करण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवुन, जमावाच्या समान उद्देशपुर्ती खातर दंगल घडवुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम १४७ सह १४९ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय ? | **नाही.** |
| ७. | काय आदेश ? | **आरोपींस दोषमुक्त करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा १ ते ६ साठीः–**

७. मुद्दा क्र.१ ते ६ संबंधीत आलेला अभियोगपक्षाचा पुरावा एकसारखा असून संक्षिप्ततेकरिता मुद्दा क्र.१ ते ६ यांचे मी एकत्रीत विवेचन करुन उत्तर देत आहे.

८. आरोपींवर ठेवलेले आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने सादर केलेल्या साक्षी पुराव्यांचे विवेचन करण्याआधी एक बाब नमुद करणे आवश्यक वाटते ती म्हणजे फिर्यादी **(सा.क्र.१)** व आरोपी यांनी त्यांचेमध्ये **(नि. क्र.६१)** वरील पुरशीस अन्वये आपापसातील भविष्यातील संबंध चांगले रहावेत याकरीता प्रस्तुत प्रकरणात तडजोड झालेली असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे, साक्षी पुरावे हे सदर तडजोडीच्या अनुषंगाने विवेचित करीत आहे.

९. यासदंर्भात, फिर्यादी **(सा.क्र.२),** यांनी त्यांच्या सरतपासादरम्यान अभियोग पक्षास सहकार्य केले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासादरम्यान **नि.क्र.४९** कडील फिर्याद सिंद्व केलेली आहे. परंतु त्यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान त्यांना मार लागल्यानंतर

थोडी चक्कर आल्याने ते खाली पडल्याचे व त्यानंतर कोणी कोणाला काय केले हे त्यांना समजले नसल्याचे कथन केलेले आहे.

**१०.** तसेच, गुणवंत **(सा.क्र.१),** गोविंद **(सा.क्र.३),** मुरलीधर **(सा.क्र.४),** श्रीकांत **(सा.क्र.५),** व सुदर्शन **(सा.क्र.६)** यांनी त्यांच्या सरतपासादरम्यान अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने त्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा उलटतपास घेतला. परंतु, उलटतपासा दरम्यान देखील त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे त्यांचा साक्षीपुरावा अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

**११.** आरोपीच्या वकीलांनी **(नि.क्र.६५)** जप्ती पंचनामा, व **(नि.क्र.६६ ते ६९)** कडील वैद्यकिय प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे मान्य केलेले असले तरी फिर्यादी **(सा.क्र.२)** व इतर साक्षीदार यांचा अभियोग पक्षास बळकटी देणारा प्रत्यक्ष पुरावा अभिलेखावर नाही.

**१२.** कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार फौजदारी खटल्यांमध्ये आरोपींच्या दोषसिध्दीकरीता साक्षीपुराव्यामधुन अपराधाची बाब निसंशयातीतरीत्या सिध्द होणे अत्यावश्यक आहे. सबब, फिर्यादी **(सा.क्र.२)** व आरोपींमधील झालेल्या तडजोडीच्या अनुषंगाने आलेला अभिलेखावरील पुरावा पाहता मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, आरोपींवर ठेवलेले आरोप सिध्द होत नाहीत. म्हणुन, मी **मुद्दा क्र.** १ **ते** ६ चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ७ करीताः-</u>**

**१३.** आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द न झाल्यामुळे त्यांना खटल्यामधून दोषमुक्त करणे न्यायोचित आहे. सबब, **मुद्दा क्र. ७** च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपीं क्र.**१. दत्तराम शंकर हंबर्डे, २. अनसाजी शंकर हंबर्डे,३. सुधाकर शंकर हंबर्डे, ४. मधुकर शंकर हंबर्डे, ५. मारोती अनसाजी हंबर्डे, ६. किशन शंकर हंबर्डे, व ७. राजेश दत्तराम हंबर्डे,** यांना **भारतीय दंड संहितचे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३,**

**१४७, सहकलम १४९** अन्वयेच्या दोषारोपातून भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७१(१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन कदबे व जात मुचलके रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अनुसार प्रत्येकी रक्कम **रु.५,०००/-** प्रमाणे जात मुचलका व जामीन कदबा द्यावा.

४. जप्त मुद्देमाल एक सागवान जातीची खण असलेली काठी, अंदाजे तीन फुट लांब, एक सागवान जातीची वाकडी खण असलेली काठी अंदाजे पावनेतीन फुट लांब, एक सागवान जातीची खण असलेली काठी अंदाजे अडीच फुट लांब, एक सागवान जातीची काठी अंदाजे पावनेतीन फुट लांब, व एक सागवान जातीची काठी खणाळ असलेली अंदाजे पावनेतीन फुट लांब, मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

५. प्रस्तुतच्या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर)

KULDIP SUBASHRAO KULKARNI
Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2026.03.18 17:29:29 +0530

दिनांक- १८.०३.२०२६.
ठिकाण- उमरी

**( के.एस.कुलकर्णी )**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, उमरी.

**परिशीष्ट**

**भाग–क**

**अभियोगपक्ष/आरोपीपक्ष/न्यायालयापक्षाचे साक्षीदारांची यादी**

| अनुक्रमांक | नांव | नि.क्र. | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | गुणवंत बाजीराव हंबर्डे | ४७ | साक्षीदार |
| २. | शिवाजी बाबुराव पुंडगे | ४८ | फिर्यादी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | गोविंद हनमंत हंबर्डे | ५६ | पंच साक्षीदार |
| ४. | मुरलीधर जगन्नाथ पुंडगे | ५९ | साक्षीदार |
| ५. | श्रीकांत बाबुराव पुंडगे | ६० | साक्षीदार |
| ६. | सुदर्शन भरत पुंडगे | ६३ | साक्षीदार |

**अभियोगपक्ष/आरोपीपक्ष/न्यायालयापक्षा यांचे कागदपत्रांची निशाणी यादी**

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| १. | ६५ | जप्ती पंचनामा |
| २. | ६६ ते ६९ | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्रे |

**भौतिक वस्तु**

| अ.क्र. | स्वरुप |
|---|---|
| १. | एक सागवान जातीची खण असलेली अंदाजे तीन फुट असलेली काठी. |
| २. | एक सागवान जातीची वाकडी खण असलेली अंदाजे पावनेतीन फुट असलेली काठी. |
| ३. | एक सागवान जातीची अंदाजे अडिच फुट असलेली काठी. |
| ४. | एक सागवान जातीची अंदाजे पावनेतीन फुट असलेली काठी. |
| ५. | एक सागवान जातीची अंदाजे पावनेतीन फुट असलेली खणाळ काठी. |

KULDIP SUBASHRAO KULKARNI
Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2026.03.18 17:29:38 +0530

दिनांक- १८.०३.२०२६.
ठिकाण- उमरी

( के.एस.कुलकर्णी )
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, उमरी.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G. B. Wavdhane, Stenographer Gr.III (On Deputation) |
| Court | - | CJJD & JMFC Umri |
| Date | - | 18.03.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | - | 18.03.2026 |
| Order uploaded on | - | 20.03.2026 |